श्री राम चंद्र मिशन
ECHOES
इंडिया
वार्तापत्र

# गुरुदेवांच्या बातम्या



## हैद्राबाद : दि. ६ ते ९ मार्च

आदरणीय कमलेशभाईंच्या आगामी हैद्राबाद दौऱ्याची बातमी स्थानिक अभ्यासींना त्यांच्या आगमनाच्या केवळ काही तास आधी मिळाली. येथे पोहोचताच त्यांनी थेट थुमकुंटा येथील विभागीय आश्रमाकडे प्रस्थान केले. सत्संगाचे संचालन केल्यानंतर, आपल्या भाषणामध्ये ते म्हणाले की, "माझ्यासाठी ही भेट महत्त्वाची आहे, कारण आपल्या प्रिय गुरुदेवांच्या महासमाधीनंतर ही माझी प्रथमच भेट आहे. भारतामधील भेटीचे प्रथम केंद्र म्हणून हे स्थान माझ्या कायम स्मरणात राहील". गुरुदेवांना भौतिक पातळीवर भेटणे महत्त्वाचे नसून, आपल्या हृदयाचे त्यांच्या हृदयाशी आंतरीक नाते निर्माण करणे आवश्यक आहे यावर त्यांनी आपल्या भाषणात भर दिला.

दि. ७ मार्च रोजी कमलेशभाईंनी बी.एच.ई.एल. आश्रमामधील ध्यानकक्षाचे उद्घाटन केले आणि दोन सत्संग संचालित केले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये प्रार्थनापूर्वक करावयाच्या तीन 'सूचनांचे' परिणाम आणि साधनेमधील नियमितता हे मुद्दे अधोरेखित केले. नंतर कमलेशभाईंनी प्रिय चारीजींच्या जिव्हाळ्याच्या प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'कान्हा' या आश्रम प्रकल्पाला भेट देण्याचे ठरवले.

दि. ८ मार्च रोजी कमलेशभाईंनी थुमकुंटा येथे सत्संग संचालित केला आणि त्यानंतर श्रोत्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, जगामधील वैगुण्यांपासून आपल्या हृदयाचे संरक्षण करण्यासाठी आपण प्रेम अंगीकारणे आवश्यक आहे. त्या दिवशी झालेल्या प्रशिक्षकांच्या बैठकीमध्ये त्यांचे कार्य आणि त्यांच्यासाठी खुल्या झालेल्या नविन पद्धतींविषयी काही मुद्दे कमलेशभाईंनी स्पष्ट केले. संध्याकाळच्या सत्संगानंतर त्यांनी पुन्हा कान्हाकडे प्रस्थान केले.

दि. ९ मार्च रोजी कमलेश भाईंनी कान्हा येथे सत्संग संचालित केला आणि या प्रकल्पाच्या वैशिष्ट्यांची बारकाईने पाहणी केली. त्या संध्याकाळी ते चेन्नईला परतले.



## महाराष्ट्र दौरा

### मुंबई : दि. १३ ते १५ मार्च

शुक्रवार दि. १३ मार्च रोजी कमलेशभाईंचे मुंबई येथे आगमन झाले व ते बदलापुर येथील नव्या आश्रमाच्या जागेला भेट देण्यासाठी गेले. तेथे सत्संग संचालित केल्यानंतर त्यांनी कार्यकारी समितीच्या सभासदांना या जागेच्या विकासकामाविषयी काही सूचना दिल्या.

पनवेल आश्रमाकडे रवाना होण्यापूर्वी त्यांनी वृक्षारोपण केले.

मुंबई येथे त्यांनी सत्संग संचालित केले, प्रशिक्षकांची भेट घेतली, अभ्यासींना संबोधित करताना 'आपल्या भौतिक आणि आध्यात्मिक जीवनामध्ये संतुलन साधणे' याविषयी त्यांनी टिपण्णी केली. याचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणाले की आपली भौतिक जीवनशैली आध्यात्मिकतेच्या वाटा खुल्या करणारी असावी.

शनिवार दि. १४ मार्च रोजी सत्संगानंतर कमलेशभाईंनी आपल्या भाषणामध्ये आपले वैयक्तिक अनुभव कथन केले, ते म्हणाले की यातना सर्वांनाच होत असतात, या यातनांमुळे आपण कितपत व्यथित व्हायचे हे आपल्या हातात आहे, ते पुढे म्हणाले की त्यांनी देखील यातना सोसल्या आहेत परंतु त्यामुळे ते कधीच व्यथित झाले नाहीत. रविवारी सकाळी पुणे, अहमदनगर, सुरत, सोलापुर, चिखली, औरंगबाद, नाशिक तसेच मुंबईमधील दूरवरच्या केंद्रांमधून इतक्या मोठया प्रमाणात जमा झालेले अभ्यासी पाहून त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला.

मुंबई येथे त्यांनी प्रशिक्षकांना संबोधित केले. भाषणानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रादरम्यान झालेल्या चर्चेमधील काही उतारे खालीलप्रमाणे :





- बाबूजी महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे आपला खरा प्रवास आपण परमतत्त्वामध्ये विलीन झाल्यानंतरच सुरु होतो. हे थोडे असे आहे की, जीवनाची खरी सुरुवात विवाहानंतर होते हे त्यांनी नमूद केले.
- ध्यान करताना येणारे विचार कसे हाताळावेत, याविषयी बोलताना ते म्हणाले की ध्यान करताना विचार येणे स्वाभाविक आहे, विचारशून्य अवस्था प्राप्त करणे हे काही आपले उद्दिष्ट नाही. असे असले तरी जर दिव्य प्रकाशाचा विचार संपूर्ण वेळ आपल्या समवेत ठेवला तर विचार येत असताना देखील ध्यान होऊ शकते.

रविवारी सकाळी सत्संगानंतर, लवकर भोजन घेऊन ते नाशिककडे रवाना झाले.

## मध्य महाराष्ट्र : दि. १५ ते १९ मार्च

दुपारी कमलेशभाई रस्तेमार्गाने **नाशिक** येथे पोहोचले. त्यांनी तेथे जमलेल्या सुमारे ३०० अभ्यासींसाठी सत्संग संचालित केला. संध्याकाळी त्यांनी आश्रमाच्या जागेमधील तात्पुरत्या ध्यानकक्षाचे उद्घाटन केले. युवकांसोबत तासभर चाललेल्या चर्चेदरम्यान त्यांनी नवे अभ्यासी, टेलिव्हिजन पाहाताना वेळेचा अपव्यय, आधुनिक कुटुंबाची जीवन शैली आणि आपण स्वत:मध्ये सुधारणा कशी घडवू शकतो अशा अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

दि. १६ मार्च रोजी सकाळी सत्संग आणि न्याहरी नंतर त्यांनी औरंगाबादच्या दिशेने प्रस्थान केले, या मार्गामधील उपकेंद्र **येवला** येथे थांबून, त्यांनी सत्संगाचे संचालन केले. यावेळी बारा नव्या अभ्यासींनी ध्यान करण्यास प्रारंभ केला आणि दुपारच्या जेवणानंतर पुन्हा रस्त्यामार्गे प्रवास करत ते सुमारे ३ वाजता **लासुर** केंद्रामध्ये पोहोचले. येथे त्यांनी नियोजित ध्यानकक्षाच्या जागेवर एका झाडाखाली सुमारे पन्नास अभ्यासींसाठी सत्संगाचे संचालन केले. उपस्थितांसाठी हा एक अविस्मरणीय असा क्षण होता. शेवटी दुपारी ४ वाजता कमलेशभाईंचे **औरंगाबाद** येथे आगमन झाले. औरंगाबाद आश्रमामध्ये सत्संगाचे संचालन करण्यापूर्वी त्यांनी 'प्रेमपूर्वक ध्यान करण्याची आवश्यकता' या विषयावर छोटे भाषण केले.

मंगळवार दि. १७ रोजी कमलेशभाईंनी औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महविद्यालयाला भेट दिली व 'ध्यानाचा अनुभव' या विषयावर श्रोत्यांना संबोधित केले. विद्यार्थी, अध्यापक आणि आमंत्रित व्यक्ती असे एकूण सुमारे दोनशे मुमुक्षू या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपल्या भाषणामध्ये त्यांनी 'ज्ञान संपादण्यापेक्षा अनुभवांमधून शिकणे महत्त्वाचे असते' यावर भर दिला. ध्यानाचे स्वरुप तसेच सहजमार्ग प्रणालीमध्ये प्राणाहुतीमुळे ध्यान धारणेला गहन आधार मिळतो हे त्यांनी स्पष्ट केले. येथे त्यांनी रिलॅक्सेशन तंत्राचे प्रात्यक्षिक दिले. अनुभव घेण्यासाठी उत्सुक असणाऱ्यांसाठी त्यांनी ध्यानाचे सत्र संचालित केले, बहुतेक सर्वांनीच या सत्रामध्ये भाग घेतला. सत्राच्या शेवटी सुमारे चाळीस विद्यार्थ्यांनी साधना सुरु करण्यामध्ये रस दाखवला.

नंतर त्यांनी पुढे **चिखली**कडे प्रस्थान केले. येथे त्यांनी बावीस नव्या अभ्यासींसमवेत सुमारे दोनशे पन्नास अभ्यासींसाठी सत्संग संचालित केला. सत्संगानंतर त्यांनी सुमारे पस्तीस मिनिटे श्रोत्यांना हिंदीमध्ये संबोधित केले. नंतर अभ्यासींसोबत भोजनाचा आस्वाद घेतला व त्यांनी स्वत: सर्वांना प्रसादाचे वाटप केले.











दि. १८ मार्च रोजी सत्संगाच्या संचालनानंतर, ते पुढे **जालन्या**कडे निघाले. जालना येथे सत्संगाचे संचालन करुन, त्यांनी एका अभ्यासीने ध्यानकेंद्रासाठी दान केलेल्या जागेला भेट दिली.

औरंगाबादला परतल्यावर त्यांनी आश्रमात सायंकालीन सत्संगाचे संचालन केले आणि स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन देत त्यांनी सर्वांशी हिंदीमधे संवाद साधला. त्यांच्या तेथील वास्तव्याच्या कालावधीत अभ्यासींना ते आपल्यापैकीच कोणीतरी एक आहेत असे वाटत होते.

दि. १९ मार्च रोजी, त्यांनी **अहमदनगर** केंद्राकडे प्रयाण केले. तेथे ओम गार्डन मंगल कार्यालयात सकाळच्या सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते, त्यानंतर कमलेश भाईंनी एका वयोवृध्द अभ्यासीच्या घराला भेट दिली. औरंगाबादला परतण्याऐवजी त्यांनी त्यांचा बेत बदलून पुण्याला जाण्याचे ठरवले.

## पुणे : दि. १९ ते २२ मार्च

कमलेशभाईंचे त्यांच्या छोटयाश्या लवाजम्यासह संध्याकाळी पुणे येथे आगमन झाले आणि एका अभ्यासीच्या घरी सत्संग संचालित करण्यात आला. दि. २० रोजी त्यांनी पानशेत रिट्रीट सेंटरला प्रस्थान केले. त्यांच्या भेटीच्या संपूर्ण कालावधीत त्यांनी सकाळच्या व संध्याकाळच्या सत्संगाचे संचालन केले. त्यांनी १५ नवीन प्रशिक्षक तयार केले व अनेक वेळा अभ्यासींना संबोधित केले. त्यापैकी एका भाषणात ते म्हणाले, “जीवनातील कोणताही प्रसंग असूदे, आपल्या हृदयातून प्रेमाचा ओघ अखंड वाहिला पाहिजे, ते नदीप्रमाणे असले पाहिजे, डबक्याप्रमाणे नाही.” दुसऱ्या सत्रात ते म्हणाले, “हृदय हे नेहमीच आपल्याला सत्य सांगेल व योग्य मार्गदर्शन करेल. लोभ व अहंकार ढवळाढवळ व दिशाभूल करतात. हृदयाचे अनुसरण करण्यास धैर्य लागते. नेहमी तुमच्या हृदयाचे अनुसरण करा.”

त्यांचा कुटिरामधील वेळ नवीन अभ्यासींना भेटण्यात, विद्यमान अभ्यासींशी संवाद साधण्यात, हास्य आणि अव्याहत काम यामध्ये व्यतीत होत होता. प्रत्येक संध्याकाळी त्यांनी खडकवासला धरणाच्या आल्हाददायक अशा काठावर फेरफटका मारण्याचा आनंद घेतला. तिथे काही क्षण नि:शब्द बसून मग अभ्यासी व मुलांशी बातचीत केली. त्यांच्या मोकळेपणाने, प्रत्येकाबद्दलच्या प्रेमाने सर्वांना भारून टाकले.

## आंध्रप्रदेश किनारपट्टी प्रदेशाचा दौरा

### दि.२ ते १२ एप्रिल

दि. २ रोजी कमलेशभाई सकाळी ६.३० वाजता तयार होऊन ध्यानाला बसले. आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीवर असलेल्या अनेक केंद्रांना भेटी देण्याच्या या नवीन प्रवासासाठी त्यांनी गुरुदेवांना प्रार्थना केली. चारीजींना या सर्व केंद्रांना पुन्हा एकदा भेट द्यायची होती पण अनेक कारणांमुळे ते शक्य झाले नाही याचा उल्लेख त्यांनी केला.

सकाळी ९ च्या सुमारास त्यांचे **सुल्लुरपेट** येथे आगमन झाले, आणि तेथे जमलेल्या १२० अभ्यासींसाठी त्यांनी सत्संगाचे संचालन केले. छोट्या भाषणा नंतर त्यांनी **नेल्लोरला** प्रयाण केले. दुसऱ्या दिवशी नेल्लोर शहरापासून १५ कि.मी. अंतरावर असलेल्या **मन्नावरप्पाडू** येथील नवीन ‘सुलोचना सदन’ आश्रमाचे त्यांनी उद्घाटन केले. तेथील भाषणात त्यांनी विषद केले की संस्कार व अहंकार या दोन भिन्न बाबी आहेत. अहंकाराचा संस्कारांशी काही संबंध नाही. जेव्हा आपण मी हे करणार नाही, अथवा मी माझ्या जोडीदारास नीट वागणूक देणार नाही या बाबत दुराग्रही होतो तेव्हा तो हेकेखोरपणा असतो. तो प्रक्षुब्धता, गोंधळ आणि अधिक संस्कार निर्माण करतो. अहंकार हा संस्कारांमुळे येत नसून अहंकार अधिक संस्कार निर्माण करतो.



श्री राम चंद्र मिशन

एकोज इंडिया वार्तापत्र



त्यांच्या पुढील दौऱ्यात त्यांनी **कवली** या आश्रमास भेट दिली व दि.४ ते ६ एप्रिल हा काळ त्यांनी **ओनगोल** येथे व्यतीत केला.

या ठिकाणी स्थानिक तसेच जवळपासच्या केंद्रांमधील अभ्यासी त्यांच्या गुरुदेवांना भेटण्यासाठी मोठ्या संख्येने गोळा झाले होते, त्यांच्यासाठी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व अभ्यासी तसेच मुलांसोबत वेळ व्यतीत केला. दि. ६ रोजी चिलकलुरीपेटाला जाताना त्यांनी **यनमडला** या छोट्या गावास भेट दिली, तिथे त्यांनी सहजमार्गाविषयी अधिक जाणू इच्छिणाऱ्या २५० स्थानिक लोकांना संबोधित केले. त्यांनी जीवनाचे ध्येय व ध्यानाची गरज याबाबत एक संदेश दिला.

त्यानंतर कमलेशभाईंनी **चिलकलुरीपेटाला** प्रयाण केले. सत्संगानंतर त्यांनी आश्रम अनुगृहित केला व छोट्या संदेशाद्वारे स्थानिक चमूस वृक्षारोपण करण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की लालाजींची इच्छा होती की सर्व आश्रम काकाभुसुंदी आश्रमाप्रमाणे हिरवेगार व शांततामय असावेत; वृक्ष प्राणाहुती जतन करतात, परंतु माणसे ती जतन करु शकतात किंवा गमावूही शकतात. म्हणून भरपूर झाडांची वाढ आश्रमास जागृत ठेवते.

दुपारपर्यंत ते **कोलाकलूर** आश्रमात पोहोचले, तेथे त्यांनी सत्संगाचे संचालन केले. किनारपट्टीवरील मेळाव्याचे खास वातावरण सतत जाणवत राहिले. दुपारी आराम करताना ते म्हणाले की या दौऱ्याच्या पाठीशी गुरुपरंपरा आहे व ते संपूर्ण जगावर विशेष कार्य करीत आहेत. आध्यात्मिक खुलेपणा हा मानवजातीच्या भल्यासाठी व अस्तित्वासाठी आवश्यक आहे.

दि. ७ एप्रिल रोजी कमलेशभाईंचे सकाळी ८.३० वाजता **गुंटुर** आश्रमात आगमन झाले. त्यांचे स्वागत करण्यासाठी सुमारे ४०० अभ्यासी तेथे जमले होते. सत्संगानंतर त्यांनी परिसरास भेट दिली व प्रत्येक बाबीचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांच्या भेटीची आठवण म्हणून त्यांनी तीन आंब्याच्या रोपांचे रोपण केले. सकाळी १०.३० वाजता त्यांनी विजयवाडाकडे प्रयाण केले.

विजयवाडा येथे जाताना कमलेशभाई केएल विद्यापीठात थांबले. त्या ठिकाणी विजयवाडा येथील चमूने एक खुले सत्र आयोजित केले होते. सुमारे ३०० विद्यार्थी व अध्यापकांनी जीवनातील ध्यानाची गरज याची तोंडओळख उत्साहाने करुन घेतली. त्यांच्या स्फूर्तिदायक भाषणानंतर त्यांनी शिथिलपणाचे( रिलॅक्सेशन) एक सत्र संचालित केले व अगदी थोड्याच वेळात सहभागी लोक प्रगाढ अवस्थेत बुडून गेले. त्यानंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रथम सिटींग दिले व पुढील सिटींग पाठोपाठच्या दिवशी दुरुन (रिमोट) देऊन प्रारंभिक सिटींग्स पूर्ण केली.

विजयवाडा आश्रमात जवळपास ४० मुलांनी हृदयातून प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या गाण्याने त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले. सत्संगानंतर त्यांनी आश्रमाशेजारील एसएमएसएफ या इमारतीस भेट दिली. त्यांनी केंद्रप्रमुखांना बहुमूल्य सूचना दिल्या व शहराच्या केंद्रस्थानी असलेल्या, मूल्यवान अशा या जागेचा सर्वोत्कृष्ट उपयोग कसा करावा याविषयी सल्ला दिला. आश्रम प्रथमदर्शी नजरेत भरण्यासाठी त्यांनी दोन भव्य व उंच इमारती बांधण्यास सुचविले. संध्याकाळी त्यांच्या कुटिरामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी आकांक्षा व इच्छा यामधील फरकाचे यथार्थ ज्ञान दिले, व सहजमार्गाची प्रार्थना 'इच्छांचा' उल्लेख का करते यावर विचार करण्यास सांगितले.

दि.८रोजी सकाळी दुसरा सत्संग संचालित केल्यावर गुरुदेवांनी एक छोटे भाषण केले. नवीन अभ्यासींचे खुल्या दिलाने स्वागत केले पाहिजे आणि त्यांना सहजमार्गाचा अनुभव घेण्यास उपयुक्त वातावरण आपण निर्माण केले पाहिज असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.







एलूर मार्गे ते पुढे **राजामुंद्री** आश्रमाकडे रवाना झाले. यावेळी त्यांनी पुन्हा आश्रमाच्या अवतीभोवती वृक्षारोपण करण्याचे, झाडे वाचविण्याचे महत्व कथन केले.

९ तारखेस सायंकाळी **काकीनाडा** आश्रमात पोहोचण्याआधी त्यांनी **अमालपूरम** आणि **यानम** या केंद्रांना भेट दिली.सत्संगानंतर दिलेल्या भाषणात त्यांनी आपल्या साधनेमध्ये सातत्य असण्याची आणि कायमस्वरूपी टिकण्याची आवश्यकता असावयास हवे असे सांगितले. "छोटे प्रयत्नच पुढे जाऊन मोठ्या गोष्टींमध्ये परिवर्तित होतात. सुरुवातीस छोटे प्रयत्न दिसून येत नाहीत .पण आपल्या हृदयात निर्माण झालेली प्रत्येक छोटी स्थिती (आंतरिक) वृद्धिंगत होत जाते, अगदी त्या वरून येणा–या पाण्याच्या छोट्या थेंबांप्रमाणे. प्रत्येक स्थिती ही देखील त्याप्रमाणेच असते. आपण त्या थेंबांचे बाष्पीभवन न होऊ देता त्यांना आपल्या हृदयात साठवून ठेवले पाहिजे आणि त्यांचा सागर बनवला पाहिजे. आणि जेव्हा हा माझा सागर माझ्या गुरूदेवांच्या सागरामध्ये लय पावेल, तेथे सौंदर्य असेल, विलक्षण सौंदर्य."

कमलेशभाई विशाखापट्टणपासून सुमारे ४० किमी अंतरावर असणाऱ्या संपतिपुरम आश्रमाकडे दि. १० रोजी दुपारी पोहोचले. सायंकाळी ते अभ्यासींशी वार्तालाप करीत असताना हैद्राबादच्या प्रकल्पाबद्दल म्हणाले की हे स्थान सहजमार्गाचे मक्का होईल. चर्चा पुढे विज्ञान आणि अध्यात्म या विषयांकडे वळली. रात्रीच्या भोजनानंतर ते स्थानिक अभ्यासींसोबत भविष्यातील शक्यतांविषयी बोलत होते. त्यांनी यावेळी अध्यात्माविषयीच्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. दुसऱ्या दिवशी आळसाबद्दल उत्तर देताना ते म्हणाले, "आपली निष्क्रियताही संस्कार बनवते, काही गोष्टी न करू शकण्याची आपली अकार्यक्षमता आणि त्यावर सतत मनन करण्याने देखील संस्कारांची निर्मिती होते."

१२ तारखेस ७:३० च्या सत्संगानंतर त्यांनी समारोपाचे भाषण दिले. त्यात त्यांनी सर्वांना नियमित साधनेने आपल्या स्वत:मधे बदल घडवून आणून नवीन साधकांना आकर्षिण्याविषयी सांगितले.

त्यानंतर त्यांनी अभ्यासी आणि प्रशिक्षकांसोबत अनौपचारिक गप्पा मारल्या ; त्यात त्यांनी सर्वांना मिशनच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी दुपारी स्वयंसेवकांसोबत भोजन कले आणि त्यांच्याशी सुमारे एक तास गप्पा मारल्या.

या दौ–याच्या अखेरीस ते म्हणाले की ते खूप खूश आहेत खास करून अभ्यासींचा दृष्टिकोन , त्यांची शिस्त हे सर्व पाहून. त्यानंतर ते रेल्वेने हैद्राबाद येथे रवाना झाले.

## हैद्राबाद :१३ एप्रिल

सुमारे १० वाजता कमलेशभाई हैद्राबाद येथील दोमाल्गुडा योगाश्रमात पोहोचले. तेथे सुमारे २००० अभ्यासी त्यांची वाट पाहात होते. सत्संगानंतर ३१ मार्च २०१५ चा व्हिस्पर्स मधील संदेशास अनुसरून त्यांनी छोटेसे भाषण दिले.या संदेशामध्ये बाबूजी महाराज म्हणतात की , कान्हा शांतीवनम प्रकल्प आध्यात्मिक गर्भगृह बनणार आहे. त्यांनी अभ्यासींना ह्या ठिकाणी जास्तीत जास्त झाडे लावून खऱ्या अर्थाने वन बनविण्यास सांगितले. ते म्हणाले की या प्रकल्पासाठी किमान २,००० स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. सायंकाळी कान्हा येथे थोडा वेळ व्यतीत करून ते दिल्लीकरीता रवाना झाले.

## उत्तर भारत दौरा : १४ ते २० एप्रिल

दिनांक १४ रोजी कमलेशभाईंनी गुडगाव आश्रमात सत्संगाचे संचालन केले आणि त्यानंतर भाषण दिले.

१५ तारखेस ते सकाळी लवकरच दिल्लीहून निघाले आणि लखनौच्या अमौसी विमानतळावर पोहोचले. तेथून ते सरळ आश्रमस्थळी पोहोचले. सकाळच्या नाश्त्यानंतर आणि थोड्याश्या विश्रांतीनंतर त्यांनी बाबूजी महाराजांच्या जन्मदिवस सोहोळ्याच्या ठिकाणाच्या नकाशाची पाहाणी केली. त्यावर त्यांनी काही सूचना आणि सुधारणाही सुचविल्या. त्यानंतर त्यांनी मोटारीत बसून संपूर्ण स्थळाची पाहणी केली. नंतर त्यांनी ध्यानकक्षात सत्संगाचे संचालन केले व छोटेसे भाषण दिले.

१६ तारखेस ते शाहजहानपूरला रवाना झाले. आश्रमात ते ९ वाजता पोहोचले. काही प्रेमळ आणि उत्साही अभ्यासी हार घेऊन प्रेमपूर्वक हृदयाने त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. आश्रमातून निघून ते बाबूजी महाराजांच्या समाधीस्थळाकडे गेले आणि त्यांनी त्यावर पुष्पे अर्पण केली. ५ मिनिटांच्या छोट्या ध्यानानंतर ते ध्यानकक्षात गेले आणि त्यांनी सत्संगाचे संचालन केले.

यानंतर त्यांनी आश्रमाची पाहणी केली विशेषत: नवीन स्वयंपाकघर आणि भोजन कक्षात बऱ्याच सुधारणा करण्यास सांगितले. नंतर





त्यांनी त्यांचे मेल पाहिले व प्रशासकीय मुद्द्यांवर चर्चा केली. सायंकाळी सत्संगाचे संचालन केले आणि येथील एका प्रेमळ अभ्यासीच्या घरास भेट दिली.

एका भाषणात ते म्हणाले,” लालाजी महाराज असे म्हणत असत की आपण अशा प्रकारे साधना केली पाहिजे की ती आपल्या वर्तणूकीतून दिसून आली पाहिजे. बाकीच्यांनी म्हटले पाहिजे, “होय, हा सहजमार्गाचा अभ्यासी आहे.” आपण आपले जीवन अशाप्रकारे व्यतीत केले पाहिजे की त्याच्या स्मरणात स्वत:ला बुडवून घेतले पाहिजे आणि सायंकाळच्या शुद्धीकरणाची आवश्यकता भासली नाही पाहिजे. ही सर्वोच्च पातळीची प्राप्ती आहे.”

ज्यावेळी कमलेशभाई शाहजहानपूर येथे होते त्यावेळेस ते आंध्र किनारपटटीवर ही दूरचे सिटंग देऊन काम करीत होते.

१७ तारखेस त्यांनी सत्संगाचे संचलन केले आणि ते बाबूजींच्या घरी गेले. ज्या खोलीत बाबूजी काम करीत असत आणि राहात असत तेथे त्यांनी सत्संगाचे संचलन केले.

सकाळी ९:३० वाजता ते शाहजहानपूर वरून फतेहगढकडे रवाना झाले. आश्रमात त्यांनी सत्संगाचे संचालन केले आणि आश्रमाच्या बांधकामात सुधारणा सुचविल्या. आपल्या संदेशामध्ये ते म्हणाले “त्यांचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविणे हीच आपली गुरु दक्षिणा आहे. नवीन अभ्यासी साधना पुढे चालू ठेवोत अथवा नाही ठेवोत ही सर्वस्वी त्यांची मर्जी आहे. पण त्यांना सहजमार्ग ध्यानपद्धतीबद्दल माहित असावयास हवे. जेव्हा त्यांना आपली गरज असेल तेव्हा आपले द्वार यांच्यासाठी उघडे आहे हे त्यांना माहीत असावयास हवे. त्यांच्यावर टीका करू नका, सहजमार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे.”

जेव्हा सर्व अभ्यासींनी गुरुदेवांना रात्रीचे भोजन वाढताना पाहिले तेव्हा सर्वांची हृदये प्रेमाने आणि कृतज्ञतेने भरून आली. त्यांनी रात्री आश्रमातच राहण्याचे ठरविले आणि १८ तारखेस सायंकाळी ६ वाजता ते फतेहगढहून रवाना झाले. लखनौला जाताना वाटेत ते हरदोई येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिथी कक्षामध्ये काही काळ विश्रांतीसाठी थांबले होते. लखनौ आश्रमाकडे जाण्याआधी ते स्थानिक अभ्यासींना भेटले व त्यांच्यासाठी सत्संगाचे संचालन केले.

१९ तारखेस कमलेशभाई सकाळी लवकर उठले. आपले ई–मेल पाहीले व त्यानंतर ध्यानकक्षामध्ये सकाळचा सत्संग संचालित केला. त्यानंतर त्यांनी भाषण दिले. त्यात त्यांनी काटेकोरपणे साधना करण्याविषयी सांगितले. त्यांनी शिस्तबद्ध असण्याची निकड असल्याचे सांगून ते म्हणाले की हे सर्व अभ्यासींच्या भल्यासाठी आहे.

त्यांनी स्वयंसेवकांसोबत दुपारचे भोजन घेतले व संध्याकाळी ते सत्संगासाठी ध्यानकक्षात आले. ते भाषणात म्हणाले, “गोष्टींबद्दल इच्छा बाळगणे सोडून द्या. स्विकारायला शिका आणि ते आनंदाने करा. आपण भोग स्विकारायला शिकले पाहिजे आणि आनंदाने त्यातून शिकले पाहिजे. कडवटपणा, रागीटपणा आणि सुन्न हृदय गुरूदेवांची कृपा नाकारते, याउलट सर्व परिस्थितीत आनंदी असण्याने आणि कृतज्ञ असण्याने कृपा बरसते आणि आपोआप त्या व्यक्तीची प्रगती होते.” त्यांनी यानंतर स्वयंसेवकांबरोबर रात्रीचे जेवण घेतले.

२० तारखेस सकाळी ९ वाजता ते आश्रमातून अमौसी विमानतळाकडे नवीन दिल्लीच्या विमानात चढण्यासाठी आणि तेथून पुढे अहमदाबादला जाण्यासाठी रवाना झाले.



## मणपाक्कम येथील बातम्या



### लॅटिन अमेरिका व आयबेरियन द्वीपकल्प येथील अभ्यासींसाठी परिसंवाद : दि. ९ ते १४ फेब्रुवारी

ब्राझिल, चिली, कोलंबिया, इक्वाडोर, फ्रान्स, हैती, मार्टिनिक, मेक्सिको, मोरोक्को, पोर्तुगाल, स्पेन, यु.एस.ए. व वेनेझुएला येथील अभ्यासी या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते.

दररोज तीन सत्संग व दोन कार्यक्रम संचालित करण्यात येत होते. स्व-अवलोकन, छोट्या गटांमध्ये चर्चा, सहभागींनी केलेली टिप्पणी, विचारांची व भावनांची देवाण-घेवाण अशा सत्रांचाही परिसंवादात समावेश होता. 'गुरुदेवांचे आंतरीकरण करा व त्यांच्या शिकवणुकीचे बाह्यीकरण करा' या संकल्पनेवर आधारित अनेक सादरीकरणांची मालिका प्रस्तुत करण्यात आली. लालाजी महाराजांनी प्रस्तुत केलेल्या 'संवादाची तत्वे' यावर आधारित सत्रादरम्यान सहभागींना आत्मपरीक्षण करण्याची, स्वतःच्या संवादाच्या शैलीविषयी प्रश्नांची उत्तरे देण्याची व त्यामध्ये आवश्यक असणाऱ्या बदलांबद्दल विचार करण्याची संधी प्राप्त झाली. परिसंवादाच्या शेवटच्या काही दिवसात अभ्यासींनी आपल्या प्रश्नांच्या उत्तरांची देवाण-घेवाण केली व आपले वैयक्तिक अनुभव उदाहरणादाखल सांगितले.

शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी परिसंवादात सहभागी झालेल्यांना कमलेशभाईंनी संबोधित केले. त्या भाषणामधील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे :

- आपल्या ज्ञानाला आपल्या अनुभवाचे पाठबळ असावे. आपल्या विचारांमध्ये मोठी ताकद आहे. परंतु त्यालाही अनुभवाचा आधार असणे आवश्यक आहे. उदा.- हृदयातून जाणवलेले अंतर्ज्ञान, नंतर ते खरे सत्य बनते.
- कमी बोला. आपली बाह्य वर्तणूक ही आपल्या आंतरीक सौंदर्याचे प्रकटीकरण असते. जेव्हा सर्व काही योग्य प्रकारे केले जाते तेव्हा शुद्धता वृद्धिंगत होते.
- आपली सफाईची क्रिया अत्यंत परीणामकारक आहे. या मूळ क्रियेमध्ये तीन वेगवेगळे प्रकार करता येतात. १. एखादा निर्णय घेण्याआधी अल्पकाळची सफाई-नकारात्मक परीणामांना अटकाव करण्यासाठी २. एखाद्या व्यक्तीला भेटण्याआधी अल्पकाळ सफाई-संभाव्य शत्रुत्व टाळण्यासाठी ३. अल्पकाळ सफाई-एखादी नकारात्मक गोष्ट घडल्याबरोबर लगेच.

### प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम

**दि. ६ ते १५ मार्च**

प्रशिक्षकांच्या कामामध्ये झालेले बदल विचारात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या परिसंवादात ४३ बंधू-भगिनी सहभागी झाले होते. सहज मार्गाचे तत्त्वज्ञान, स्थितीचे आकलन व दहा नियम यावर आधारित सत्रे संचालित केली गेली.

कमलेशभाईंनी आपला बहुमूल्य वेळ खर्च केला आणि प्रशिक्षणार्थींना तीन वेळा संबोधित केले. प्रशिक्षकांनी विनम्र असण्याच्या आणि गाजावाजा न करता, अनामिकपणे काम करण्याच्या तसेच तळमळीने साधना करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. सभागृह संकुलाच्या गच्चीवर रात्रीच्या जेवणात जेव्हा ते सहभागी झाले, तेव्हा प्रशिक्षकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

या परिसंवादामुळे बंधुत्वाची भावना व उद्देश्याविषयी जाणीव निर्माण झाली आणि पवित्र व उदात्त अशा कामासाठी नवीन प्रशिक्षक तयार झाले.



श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया वार्तापत्र





## आपल्या भवितव्याची जडण–घडण– अखिल भारतीय युवा चर्चासत्र – मार्च

१८ ते २५ वर्षांच्या वयोगटातील सुमारे ४५० युवक या चर्चासत्रात सहभागी झाले होते. याची पूर्वतयारी म्हणून दोन महिन्यांपासून ई–मेल द्वारे काही उपक्रम त्यांना पाठविण्यात येत होते . या परिसंवादाचा भर प्रामुख्याने ‘माहिती देणे’ नसून ‘अनुभव घेणे’ यावर होता.

या परिसंवादाची सुरुवात ‘द्रष्टे (दूरदृष्टी असणारे) बना’ या चारीजींच्या भाषणाने झाली. सहज मार्गाच्या पद्धतशीर साधनेला अनुसरुन इतरांसमवेत ‘संवाद’ ते ‘सख्य’ ही उत्क्रांती कशी होते ते भगिनी एलिझाबेथ डेनली यांनी विषद केले. सहज मार्गाच्या साधनेवर आधारित प्रेरणादायी सत्रांचा इतर उपक्रमांमध्ये समावेश होता. प्रवासातून परत आल्यानंतर कमलेशभाईंनी तिसऱ्या दिवशीचा व त्यानंतरचे सर्व सकाळचे सत्संग संचालित केले. सत्संगानंतर दिलेल्या त्यांच्या भाषणांमधील काही प्रमुख सूचना खालील प्रमाणे :

- प्रार्थना करणे या पासून सुरुवात करून प्रार्थनामग्न स्थितीमध्ये संपूर्ण वेळ राहण्याचा प्रयत्न करा. ध्यानापासून सुरुवात करून ध्यानमग्न स्थितीमध्ये सर्व काळ राहण्याचा प्रयत्न करा.
- भंडाऱ्यादरम्यान आपली स्थिती एखाद्या विहिरीमध्ये सोडलेल्या बादलीप्रमाणे असते. ती पाण्यामध्ये बुडलेली असताना भरल्यासारखी वाटते, परंतु तिला बाहेर काढत असताना काही पाणी हिंदकळून सांडते. जर बादलीला भोके असतील तर बाहेर काढायच्या वेळी सर्व पाणी वाहून गेलेले असते. ही भोके म्हणजे दुसरे काही नसून आपल्या हृदयातील वासना असतात.
- दोन अर्धगोल जेव्हा निर्वात पोकळीने एकमेकांना जोडलेले असतात तेव्हा त्यांना विलग करणे फार कठीण असते. थोडी जरी हवा त्यामध्ये गेली तर त्यांना सहजतेने अलग करता येते. ही निर्वाततेची शक्ती आहे. आपल्या हृदयात अशी पोकळी निर्माण करा, की त्या स्त्रोताबरोबर एक अजोड असे बंधन तयार होईल. हृदयातील निर्वात पोकळी लहानातल्या लहान अशा इच्छेनेसुद्धा खराब होऊ शकते.
- आपल्या पालकांवर नेहमीच प्रेम करा आणि त्यांचा आदर करा. त्यांना क्लेश देण्याएतके वाईट काहीही नाही.
- जेव्हा आपण भवितव्याशी खेळ करणे थांबवतो, तेव्हाच ते उलगडते.
- आपल्या साधनेची दोन वैशिष्ट्ये आहेत. साधनेविषयीच्या आपल्या दृष्टीकोनामध्ये ५% हिस्सा साधनेचा असून ९५% हिस्सा साधनेप्रती असलेल्या आपल्या अभिवृत्तीचा आहे. साधना शिकवली जाऊ शकते. अभिवृत्ती विकसित करावी लागते.

कमलेशभाईंनी प्रश्नोत्तरांची दोन सत्रे खेळीमेळीच्या वातावणात संचालित केली. आंतरिक मार्गदर्शन मिळवण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. या युवकांच्या गटाला भेटून त्यांना आनंद झाला व



सर्वजण भविष्य काळात उच्च दर्जाच्या कामासाठी स्वत:ला तयार करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. माझे गुरुदेव, मानव विकासात सद्गुरूंची भूमिका, व्यक्तिमत्वाचे प्रकटीकरण, प्रेम आणि मृत्यु तसेच कम्प्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र ह्या पुस्तकांचा अभ्यास करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

परिसंवाद जसजसा समारोपाकडे वाटचाल करू लागला तसतशी अशा प्रसंगी जी एक प्रकारची दु:खाची छटा पसरते तिची जागा भारावून टाकणाऱ्या आनंदाने घेतली आणि एका नव्या प्रारंभाची जाणीव निर्माण झाली.

## पूर्वेकडील राज्यांतील प्रशिक्षकांचा परिसंवाद

**दि. २४ ते २८ मार्च २०१५**



'गुरुदेवांचे आंतरीकरण करा व त्यांच्या शिकवणुकीचे बाह्यीकरण करा' या संकल्पनेवर आधारित असलेल्या या परिसंवादास पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, झारखंड व सिक्किम तसेच महाराष्ट्र, मध्य प्रदेश व तामिळनाडूतील सुमारे ८२ आमंत्रित प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रशिक्षकांमध्ये वास्तविक बंधूभाव विकसित करणे आणि परस्पर सहकार्य व विचारांची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन देणे ही अशा परिसंवादांसाठी चारीजी महाराजांनी निश्चित केलेली उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून आठ समन्वयकांच्या एका चमूने कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

भाषणांच्या व चर्चासत्रांच्या निरनिराळ्या विषयांमध्ये 'जाणीवपूर्वक अंगीकारण्याची जीवन शैली', 'शुद्धता व प्रारब्ध', 'कर्म व अकर्म' या विषयांचाही समावेश होता. गुरुदेव कमलेशभाई यांनी यावर्षी प्रचलित केलेल्या नव्या तंत्रांपैकी एखाद्या तंत्राच्या प्रात्यक्षिकाने प्रत्येक सत्राची सुरुवात केली जात होती. 'हार्टफुलनेस' हे रिलॅक्सेशन तंत्र शिकण्याची संधीही प्रत्येक सहभागीस मिळत होती.

कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी संध्याकाळी प्रेक्षागृहाच्या इमारतीच्या गच्चीवर गुरुदेव कमलेशभाई यांनी मेजवानी दिली. त्यावेळी सहभागी प्रतिनिधींच्या प्रश्नांना त्यांनी अतिशय मनमोकळेपणाने, प्रेमपूर्वक उत्तरे दिली व प्रत्येकाचे ™दय काबीज केले. अशाप्रकारच्या आणखी काही कार्यक्रमांत भाग घेण्यासाठी सहभागींनी उत्सुकता प्रकट केली.

## संदेशाचा प्रसार

यानमाडला हे प्रकाशम जिल्ह्यातील यड्डनपुडी विभागातील एक छोटेसे खेडे आहे. तटीय आंध्र प्रदेशाच्या दौऱ्यादरम्यान दि. ६ एप्रिल रोजी आदरणीय गुरुदेव कमलेशभाई यांनी या खेड्यास भेट दिली व एक खुले सत्र संचालित केले. ध्यानाच्या सहजमार्ग पद्धतीविषयी अधिक जाणून घेण्यासाठी जवळ जवळ २५० खेडुत तेथे जमले होते. 'जीवनाचे ध्येय व ध्यान करण्याची गरज' यावर त्यांनी एक भाषण दिले. भगिनी उमा गंगाधर, केंद्रप्रमुख, नेल्लोर केंद्र, यांनी त्याचे तेलगूमध्ये भाषांतर सादर केले. या मतदारसंघाच्या आमदारांनीही या खुल्या सत्रात भाग घेतला. मरतुर येथे होणाऱ्या मतदारसंघ स्तरावरील सभेच्या वेळीही असे खुले सत्र घेण्यासाठी त्यांनी गुरुदेव कमलेशभाई यांना विनंती केली. सत्रादरम्यान उपस्थित झालेल्या काही प्रश्नांना कमलेशभाई यांनी ध्यान करण्याची गरज अधोरेखित करीत उत्तरे दिली.

आमदारांनी विनंती केल्याप्रमाणे दि. १६ एप्रिल रोजी प्रकाशम जिल्ह्यातील मरतुर येथे आणखी एक खुले सत्र संचालित करण्यात आले. शासकीय व अशासकीय अशा ८०० जणांनी या सत्रास हजेरी लावली. भगिनी उमा गंगाधर यांनी ध्यानाची सहजमार्ग पद्धत व मनुष्य जीवनाचे ध्येय थोडक्यात विषद करून सांगितले. त्यानंतर डॉक्टर वेंकट आर. एडारा यांनी ध्यान करण्यामुळे होणारे फायदे थोडक्यात स्पष्ट करून सांगितले. त्यांनी उपस्थितांना १० मिनिटे ध्यानास बसण्याची विनंती केली. ध्यानानंतर सर्वांना आरामदायक वाटले आणि काहीजणांनी सांगितले की त्यांना विलक्षण शांतीचा अनुभव आला. यावेळेस गुरुदेव कमलेशभाई शहाजहानपूर येथे होते. उपस्थित ८०० सहभागींना त्यांनी चाळीस मिनिटांचे दूरस्थ सिटींग दिले. सिटींगनंतर त्यांनी उपस्थित जनसमुदायास संबोधित केले व प्रारंभिक सिटींग्ज पूर्ण करण्यासाठी दि. १७ व १८ रोजी रात्री ९.०० वाजता अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या सिटींगसाठी बसण्याची विनंती केली. या समारंभाच्या संयोजनामध्ये अनेक स्वयंसेवक सक्रीयपणे सहभागी झाले होते.



श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया वार्तापत्र



## यू–कनेक्ट उपक्रम

### गाझियाबाद

दि. २९ मार्च रोजी शांतीकुंज आश्रम, गाझियाबाद येथे एक दिवसीय यू–कनेक्ट परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. आग्रा, मेरठ, हापूर, ग्वाल्हेर, मुजफ्फरनगर, मोरादाबाद, नॉयडा, वैशाली, दिल्ली व गुडगाव यासह अनेक केंद्रातील ८०हून अधिक सहभागी परिसंवादास उपस्थित होते.

बंधू सुमित अरोरा, केंद्रप्रमुख, गाझियाबाद व बंधू हरप्रीत भात्र, नॉयडा यांनी या सत्राचे संचालन केले आणि यू–कनेक्ट उपक्रमाचा गाभा–विषय, त्याचे प्रयोजन व पद्धती यांची ओळख करून दिली. सहभागींनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी संयुक्तपणे उत्तरे दिली.

स्वयंसेवकांनी ‘अभिमुखता’ व ‘योग’ यावरील एका सत्राचे अभिरूप प्रात्यिक्षिक सादर केले. आपापल्या स्थानीय क्षेत्रांमध्ये जेथे हा स्वविकास कार्यक्रम अभ्यासक्रमात समाविष्ट करणे शक्य होऊ शकेल अशा शैक्षणिक संस्था निश्चित करण्याची विनंती सहभागींना परिसंवादाच्या शेवटी करण्यात आली.

### कोल्हापूर

भिमा इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेन्ट ॲण्ड टेक्नॉलॉजी (बी.आय.एम.ए.टी)च्या व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्वविकास कार्यक्रमाची सांगता यशस्वीरित्या पार पडली. संस्थेच्या अधिष्ठात्यांकडून अतिशय उत्तम असे पाठबळ मिळाले.

ऑगस्ट २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधी दरम्यान एकूण बारा सत्रे घेण्यात आली. परस्परचर्चात्मक अशा या सत्रांना ३१ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सहभागींकडून मिळालेला प्रतिसाद व त्यांची उपक्रमातील समरसता उत्साहवर्धक होती. भिमा शिक्षण संस्थेच्या प्राध्यापक चमूनेही काही सत्रांना हजेरी लावली. कार्यक्रमाची विषयवस्तू व त्यातून होणाऱ्या मूल्याविष्काराची त्यांनी वाखाणणी केली.

२७ विद्यार्थ्यांनी ध्यानाच्या सुव्यवस्थित साधनापद्धतीचा परिचय करून घेतला व प्रारंभिक सिटींग्ज घेतली. महाविद्यालय परिसरात सामूहिक सत्संग संचालित करण्यात आले. अधिष्ठाता श्री ए.के. गुरव यांच्या हस्ते एका भव्य समारंभात सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्यांना आलेले अनुभव तसेच ध्यानाच्या तंत्रामुळे त्यांना कसा लाभ झाला ते या कार्यक्रमांतर्गत सांगितले.

यू–कनेक्ट उपक्रमाचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा या हेतूने जुलै २०१५ च्या वेळापत्रकात यू–कनेक्ट उपक्रमासाठी विशेष वेळ राखून ठेवण्यात येईल अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

### कोलकाता

दि. १४ व १५ मार्च रोजी बाबूजी मेमोरियल आश्रम, कोलकाता येथे दोन दिवसांच्या यू–कनेक्ट अध्यापन विकसन/परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बिहार, झारखंड, आसाम व पश्चिम बंगाल येथून आलेले सुमारे पंचाहत्तर अभ्यासी कार्यशाळेस उपस्थित होते. यू–कनेक्ट उपक्रमाच्या पुढाकाराचा गोषवारा/ सारांश थोडक्यात विषद करण्यात आला. त्यानंतर समन्वयक, सहाय्यक व अध्यापक यांच्या भूमिका व त्यांच्या जबाबदाऱ्या, यू–कनेक्ट चमूने संकलित केलेले साहित्य, आणि विविध संस्थांना भेट कशा प्रकारे द्यावी या विषयी चर्चा करण्यात आली. त्यानंतर सहभागींची पाच गटांत विभागणी करून प्रत्येक गटाला यू–कनेक्ट अभ्यासक्रमातील एकेक स्वाध्याय देण्यात आला. दिलेल्या विषयावर त्यांना अभिरूप सत्र सादर करण्यास सांगण्यात आले. कार्यक्रमावरील प्रतिक्रिया व भविष्यकालीन कृती आराखड्याच्या रेखांकनाच्या सत्राने कार्यक्रमाचे समापन झाले.





**आंध्र प्रदेश, उत्तर**

युु-कनेक्ट बातम्या ...



दि.१४ आणि १५ मार्च रोजी वरंगळ आश्रम, अश्वपुरम आणि विभाग १ ए मधील सतुपती येथे सरावाचे एक सत्र घेण्यात आले. ध्यान, मूल्ये, योग,धर्म यावर सादरीकरणे होती आणि 'आंतरिक प्रगतीच बाह्य प्रगतीस घडवते' हे सूत्र होते ज्यानंतर गुरुदेवांची एक चित्रफीत दाखवण्यात आली. युवकांबरोबरच अनेक स्थानिक अभ्यासी आणि प्रशिक्षकसुद्धा यात सहभागी झाले. या कार्यक्रमाने सर्व युवांना एकमेकांना ओळखण्याची आणि सहजमार्गाशी जोडून घेण्याची संधी दिली. विद्यार्थी उत्साहाने व मोकळेपणाने सहभागी झाले होते.

यु-कनेक्ट कामात सहभागी होण्यासाठी कृपया पुढील संकेतस्थळास भेट द्यावी

http://www.sahajmarg.org/resources/programs/uconnect

## मूल्यशिक्षण



एस.एच.पी.टी.द्वारे चालविण्यात येणारा मूल्यशिक्षण कार्यक्रम देशाच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. बऱ्याच विद्यालयांनी मूल्यशिक्षणाचा पाठ्यक्रम त्यांच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यास मान्यता दिली आहे.

मूल्यशिक्षणाच्या पाठ्यक्रमाची एप्रिलमध्ये अम्बुजा पब्लिक स्कूल रब्रियावास (राजस्थान) येथे आठवी आणि नववीच्या वर्गांना ओळख करुन देण्यात आली. सुरुवातीच्या सत्रानंतर विद्यार्थ्यांनी या वर्गास अनुकूल आणि उत्साहाने प्रतिसाद दिला आहे.



मूल्यशिक्षणाच्या पाठ्यक्रमाची सुरुवात सेंट मायकेल स्कूल, सिलिगुडी येथे २०१४-१५ च्या सत्रासाठी करण्यात आली. दि. ७ आणि ११ एप्रिलला अनुक्रमे ९ वी आणि ८ वीच्या वर्गांसाठी सादरीकरणे झाली. शिक्षणातून सहा प्रमुख मूल्ये कशी रुजवावीत याची कल्पना दिली गेली. थोडक्यात ही अतिशय औत्सुक्यपूर्ण सत्रे होती ज्यात विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला.

दि. ७ एप्रिलला केंद्रिय विद्यालय नं २, रेल्वे कोलोनी, झपटपूर येथे शिक्षकांसाठी मूल्यशिक्षण कार्यक्रमावर एक सत्र आयोजित करण्यात आले होते. सहभागींना मूल्ये रुजविण्याचे महत्व या विषयावर भर देत कार्यक्रमाचा आढावा देण्यात आला. सत्राच्या शेवटी शिक्षकांनी स्वयंसेवकांना वर्ग घेण्यास मदत करण्याचे आश्वासन दिले.




तुमच्या विभागातील मूल्यशिक्षण कार्यक्रमात भाग घेण्यास खालील संकेतस्थळास भेट द्यावी

http://www.sahajmarg.org/resources/programs/values-education

## युवकांचे उपक्रम:



### शोलावंदन, तामिळनाडू

दि. १४ एप्रिल रोजी शोलावंदन, शिवगंगाई आणि मदुराई केंद्राच्या ३० अभ्यासींसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आपापल्या केंद्रांमध्ये गुरुदेव, साधना पद्धती व संस्था याकडे अग्रसर होण्यासाठी पूरक अशा उपक्रमांबद्दल त्यांनी आपले अनुभव व्यक्त केले. त्यानंतर 'स्वत:मध्ये बदल कसा घडवून आणावा' यावरील गुरुदेवांच्या उक्ती व सत्योदय या पुस्तकावर आधारित चैतन्यपूर्ण सादरीकरणे झाली. अखेरीस, संस्थेच्या वाढीसाठी केल्या जाणाऱ्या उपक्रमांवर युवकांनी चर्चा केली. सर्व सहभागींसाठी या दिवसाचा कार्यक्रम एक प्रकारे अध्यात्मिक विरंगुळा होता.

### हुबळी, कर्नाटक

हुबळी केंद्रामध्ये उत्तर कर्नाटकातील अनेक केंद्रामधील ४२ युवकांसाठी दि. १३ व १४ एप्रिल रोजी दोन दिवसांचे युवासम्मेलन आयोजित करण्यात आल होते. अनेक केंद्रांना व्यक्तिगत भेटी देऊन तेथील युवकांना या सम्मेलनामध्ये सहभागी होण्यासाठी उद्युक्त करण्यासाठी हुबळी केंद्राच्या युवकांनी सुमारे एक महिन्यापासून अथक परिश्रम केले होते. या सम्मेलनामध्ये ध्येय, अध्यात्मिक प्रवास, साधना पद्धती व परिवर्तन यावर चर्चासत्रे झाली ज्यामध्ये आत्मपरिक्षण व आत्माभिव्यक्ति यावर बराच भर दिला होता. सकाळचा व्यायाम, सत्संग, निरव शांतता, खेळ, सहल व सायंकाळचे शुद्धीकरण या कलाविधींचा समावेश होता.



## उन्हाळी शिबीर, गाझियाबाद

शांतीकुंज आश्रमाच्या मुलांसाठी दि ११ व १२ एप्रिल रोजी एका उन्हाळी सत्राचे आयोजन केले होते. गाझियाबाद, नोईडा व वैशाली आश्रमामधून मुले सहभागी झाली होती व त्यांना स्वागतपर भेटीही देण्यात आल्या.

या शिबीराचा केंद्रविषय होता, 'इंद्रधनुष्य'. आश्रमाचा परिसर अनेकविध कलाकृतींनी सजविला होता व सर्वत्र अनेकविध रंग पसरले होते. शिबीराची सुरुवात एरोबिक्स या व्यायामप्रकाराने झाली. अल्पोपहाराच्या वेळी कथाकथनासमवेत मिळून-मिसळून राहण्यावर भर दिला गेला. त्यानंतर टाकाऊ वस्तूंपासून कलात्मक वस्तू बनविण्याचा कार्यक्रम झाला. दुपारच्या जेवणानंतर कळसुत्री बाहुल्यांचा प्रयोग व ध्वनीचित्रफीतीचा कार्यक्रम झाला. सायंकाळचा वेळ आश्रम परिसराची सफाई, ध्यानमंदिरातील खुर्च्यांची सफाई व रोपांना पाणी देणे यासारख्या स्वयंसेवी कामाने व्यतीत झाला. या कामाध्ये मुलांनी मन:पूर्वकता दर्शाविली व या कामामध्ये मुलांना खूप आनंद मिळाला.

स्वयंसेवकांनी फुटबॉल, क्रिकेट व रस्सीखेच यासारखे मैदानी खेळ आयोजित केले. मुलांना मूकाभिनय व सायंकाळच्या एरोबिक्समध्ये खूप मजा आली. दिवसाअंती डायरी लेखन व रात्रीची प्रार्थना झाली.



दुसऱ्या दिवशी सकाळी अल्पोपहारानंतर एरोबिक्सचा कार्यक्रम झाला. अभ्यासी जेव्हा रविवारच्या ध्यानाकरिता गेले तेव्हा मुलांनी मुलांचा कक्ष सजविला व खेळ खेळले. मिळून-मिसळून राहणे, एकता, परिश्रम, निसर्गाबद्दल आदर, परस्पर सहायता इ. विषयांवर त्यानी चर्चा केली व त्याचे महत्व जाणले. पुढच्या उन्हाळी शिबीराची वाट पाहात ते आपापल्या घरी गेले.

# लघुवृत्त



## कोइम्बतूर, तामिळनाडू

एका नवीन उपकेंद्राचे, कोइम्बतूर विमानतळाजवळ, ५ एप्रिल रोजी, तिथे जवळ राहणाऱ्या सुमारे ४० अभ्यासींच्या सुविधेसाठी उद्घाटन करण्यात आले. सकाळी ७:३० वाजताच्या सत्संगाचे संचालन विभाग प्रमुख, बंधू टि. व्ही. व्ही. राव ह्यांनी केले. यावेळी १० नवीन सदस्यांच्या बरोबरीनेच जवळजवळ ८० विद्यमान अभ्यासी उपस्थित होते. ह्यानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र घेण्यात आले ज्यामध्ये कोइम्बतूरचे केंद्र प्रमुख, बंधू टि. एस. मणियम, आणि विभाग प्रमुखांनी प्रेक्षकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. अनुभवकथनाच्या सत्रानंतर, कार्यक्रमाची सांगता, दुसऱ्या सत्संगाने आणि भोजनाने झाली.

## भिलवाडा, राजस्थान



दि. ८ मार्चच्या सत्संगानंतर, भिलवाडामध्ये एक सादरीकरण करण्यात आले ज्याचा विषय 'जीवनाशी स्पर्धा' असा होता व यावेळी अभ्यासींचे मित्र व परिवार सुद्धा आमंत्रित होते. सहभागींना जीवनाशी निगडीत दहा प्रश्नांच्या संचावर मतप्रदर्शन करण्यास सांगण्यात आले: हा प्रवास आहे की शर्यत आहे? जर जीवन ही शर्यत आहे तर आपण कशासाठी शर्यत करत आहोत? आपण सगळे एकाच दिशेने शर्यतीत आहोत का? आपण आपली दिशा ठरवण्यासाठी विराम का घेत नाही? संवाद सत्रात, सहभागींना विचारण्यात आले की कुठला प्रश्न त्यांना सर्वात जास्त भिडला होता. निष्कर्षाअंती, त्यांना प्रतिक्रियांची टिप्पणी देण्यास सांगण्यात आली. सर्वांनी सांगितले की त्यांना कार्यक्रम आवडला आणि त्यांना पुढेही नियमित सत्रे आयोजित केलेली आवडतील. अशी आशा आहे की हा कार्यक्रम परिवर्तनाची प्रक्रिया सुरु करण्यात की ज्याने त्यांच्या जीवनाचा मार्गक्रम बदलेल सफल झाला आहे.

## मंगलोर, कर्नाटक



क्रेस्टचे संचालक, बंधू मोहनदास ह्यांनी, दि. २२ फेब्रुवारीला 'भक्ती कशी वाढवावी' ह्यावर कार्यशाळा घेतली. त्यास मंगलोर आणि नजीकच्या केंद्रांचे ६९ अभ्यासी उपस्थित होते. त्यांनी गुरुंप्रती भक्तीचे आणि जलद अध्यात्मिक प्रगतीची काय आवश्यकता आहे त्याचे महत्त्व विषद केले. अभ्यासींना अशा तऱ्हेने भक्ती कशी वाढीस लावता येईल ह्यावर त्यांचे मत विचारण्यात आले आणि भक्तीच्या वाढीतील अडथळयांची यादी करण्याची विनंती करण्यात आली.

दुपारच्या जेवणानंतर, ह्याच विषयावर समूह चर्चा झाली. मतांचा आढावा घेताना बंधू मोहनदास म्हणाले की जर गंभिरतेने प्रत्येक अभ्यासीने चर्चिले गेलेले ३ ते ४ मुद्दे आचरणात आणले, तर तो/ती नक्कीच भक्ती वाढवील व वेगाने प्रगती करील! प्रश्नोंत्तरांच्या सत्राने काही शंकांचे निरसन झाले. अभ्यासींना काय वाटते त्यांनी स्वत: भक्ती वृद्धिंगत होण्यासाठी काय केले पाहिजे ह्याच्या आत्मपरीक्षणासाठी १० मिनिटे देण्यात आली, ज्यानंतर प्रत्येक माणसाने एक मुद्दा इतरांसमोर मांडला . कार्यशाळा संध्याकाळच्या ४ वाजताच्या सत्संगाने समाप्त झाली.



© 2015 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.